*निश्चयाचा महामेरु*
*बहुत जनांसी आधारु*
*अखंड स्थितीचा निर्धारु*
*श्रीमन्त योगी*

*नरपती हयपती गजपती*
*गडपती भूपती जलपती*
*पुरंदर आणि शक्ती*
*पृष्ठ्भागी*

*यशवन्त कीर्तिवन्त*
*सामर्थ्यवन्त वरदवन्त*
*पुण्यवन्त नीतीवन्त*
*जाणता राजा*

*आचारशील विचारशील*
*दानशील धर्मशील*
*सर्वज्ञपणे सुशील सकलांठायी*

*धीर उदार गंभीर*
*शूर, क्रियेसी तत्पर*
*सावधपणे नृपवर*
*तुच्छ केले*

*देव धर्म गो–ब्राम्हण*
*करावया संरक्षण*
*हृदयस्थ झाला नारायण*
*प्रेरणा केली*

*या भूमंडळाचे ठायी*
*धर्मरक्षी ऐसा नाही*
*महाराष्ट्र–धर्म राहीला काही*
*तुम्हा कारणे*

*कित्येक दूष्ट संहारीला*
*कित्येकासी धाक सुटला*
*कित्येकास आश्रयो जाहला*
*शिवकल्याण राजा*